महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET), सिंधुदुर्ग**

प्लॉट नं. ८७ व ८९, नवनगर वसाहत, गरुड सर्कलजवळ, सिंधुदुर्गनगरी
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग- ४१६८१२
dietsindhudurg@maa.ac.in/ dietsind@gmail.com https://dietsindhudurg.in

जाक्र.जिशिप्रसंसि/मित्र उपक्रम/२०२६/३८१ दि. ०६.०७.२०२६

प्रति,

गटशिक्षणाधिकारी,
पं.स.(सर्व), जि. सिंधुदुर्ग

**विषयः मित्र उपक्रमाची अंमलबजावणी बाबत.**

**संदर्भ :- मा.संचालक, रा.शै.सं.प्र.प.महाराष्ट्र,पुणे यांचे पत्र जा.क/रा.शै.सं.प्र.प/कला व क्रीडा/मित्र उपक्रम प्रशिक्षण/२०२६-२७/१९२८१७७, दि.२९.०५.२०२६**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मित्र उपक्रमांतर्गत राज्यातील अनेक शाळांमध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांना आनापान साधनेचे अंदाजित २ तासांचे प्रशिक्षण देऊन दररोज १० मिनिटांचा सराव केल जात आहे. तसेच अनेक शिक्षक १० दिवसांचे विपश्यना साधना शिबिरात सहभागी झाले आहेत. सदरचा कार्यक्रम राज्यातील सर्व इ.५वी ते १० वी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिक व बौदिधक वाढीसाठी उपयुक्त ठरणार आहे.

मित्र उपक्रमांतर्गत ज्या शिक्षकांनी १० दिवसांचा विपश्यना अभ्यासक्रम पूर्ण केलेला नाही त्यांना तीन तासांचे आनापान प्रशिक्षण घेणे संदर्भात निर्देश देण्यात आलेले आहेत. आपल्या स्तरावरुन दरमहा केंद्रस्तरीय शिक्षण परिषदांचे आयोजन केले जाते. केंद्रस्तरीय शिक्षण परिषदांमधील विषयाचे प्राधान्यक्रम ठरवून मित्र उपक्रमाचे नियोजन करण्यात यावे.

**जिल्ह्यातील सर्व केंद्रातील १००% केंद्रप्रमुखांचे ०३ तासांचे आनापान प्रशिक्षण प्रशिक्षण पूर्ण करुन त्यांच्यामार्फत जुलै २०२६ च्या शिक्षण परिषदेत केंद्रातील शिक्षकांना प्रशिक्षण देणे नियोजित आहे. यासाठी केंद्रप्रमुखांचे प्रशिक्षण दि.१० जुलै २०२६ रोजी १०.०० ते ०२.०० या वेळेत आयोजित करण्यात येत आहे.** प्रशिक्षणाचे नियोजन खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | दिनांक व वेळ | ठिकाण | सहभागी तालुके | अधिक माहितीसाठी संपर्क |
|---|---|---|---|---|
| १ | १०.०७.२०२६ सकाळी १०.०० ते दुपारी ०२.०० | नवसरणी कॅथलिक सेंटर, खासकील वाडा, सावंतवाडी जेल मागे, चराठा, सावंतवाडी | सावंतवाडी, दोडामार्ग, कुडाळ, वेंगुर्ले | हर्षद रमेश राव -८५५२०२५८१४<br>भिमराव हळदीकर- ९४२१२३८८०९<br>सूरज साळवी- ८६९२०९०१८५ |
| २ | | विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी आदर्श महाविद्यालय, तळेरे, ता.कणकवली | मालवण, कणकवली, देवगड, वैभववाडी | प्रशांत हटकर- ८६००३०९३९८<br>डॉ.राजेंद्र पारकर- ९४२२३७३५८८ |

सदर प्रशिक्षणासाठी आपल्या तालुक्यातील १००% केंद्रप्रमुखांना **उपस्थित राहणेबाबत आदेशित करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.** प्रशिक्षणार्थ्यांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आलेली आहे. सदर प्रशिक्षणासाठी कोणत्याही प्रकारचा निधी नाही याची संबंधितांना कल्पना देण्यात यावी.

(सविता परब)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक,
जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

(राजेंद्र वसंत कांबळे)
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
सिंधुदुर्ग.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**

१) मा.संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे
२) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सिंधुदुर्ग

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी-** व्यवस्थापक, धम्मभूमी विपश्यना समिती सिंधुदुर्ग

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे
७०८,आर बी कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे-४११०३०.
संपर्क क्रमांक (०२०)२४४७८१२२ ईमेल :.arts.sportsdept@maa.ac.in

जा.क्र.राशैसंप्रपम/कला व क्रीडा /मित्र उपक्रम प्रशिक्षण/सन २०२६-२७/ दिनांक:- /०५/२०२६.

प्रति,

१. विभागीय शिक्षण उपसंचालक ( सर्व)
२. उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण (सर्व)
३. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व )
४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/योजना), जि. प. (सर्व)
५. शिक्षण निरीक्षक (दक्षिण/उत्तर/पश्चिम) बृहन्मुंबई.
६. प्रशासन अधिकारी,म.न.पा./न .पा.(सर्व)

**विषय : - मित्र उपक्रमाची अंमलबजावणी करणेबाबत..**

**संदर्भ :-** १) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०११ (२९६/११) माशि-३, दि. ५ आक्टोबर, २०११ आणि २७/०१/२०१२.

२) मा. आयुक्त ( शिक्षण ) म.रा. पुणे यांचे पत्र जा..क्र. शिक्षण आयुक्ता/ विप, स/२०२०-२१/४३, दि ०८ डिसेंबर, २०२०

३) विपश्यना विशोधन संस्था (विपश्यना रिसर्च इन्स्टिट्यूट ) यांचे पत्र दि. ४/०२/२०२६

४) कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचे पत्र क्रमांक:- संकीर्ण-२०२६/प्र.क्र.७८/एस.डी. ४ दि.०८ मे, २०२६

५) प्रस्तुत कार्यालय पत्र SCERT-४६.०/२३/२०२६-ART & SPORTS I/१८९२८९८/२०२६ दि. १२.०५.२०२६

६) विपश्यना विशोधन संस्था (विपश्यना रिसर्च इन्स्टिट्यूट ) यांचे पत्र दि. १८/०५/२०२६

उपरोक्त संदर्भ क्र. ५ नुसार प्रस्तुत कार्यालयामार्फत मित्र उपक्रमाबाबत निर्देश देण्यात आलेले होते. सदर पत्रामध्ये मित्र उपक्रमांतर्गत राज्यातील अनेक शाळांमध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांना आनापान साधनेचे अंदाजित २ तासाचे प्रशिक्षण देऊन दररोज १० मिनिटांचा सराव केला जात आहे. तसेच अनेक शिक्षक १० दिवसांचे विपश्यना साधना शिबिरात सहभागी झाले आहेत. यासाठी शासनाने २७ जानेवारी, २०१२ रोजी सविस्तर परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते. यानंतर वेळोवेळी याबाबत शिक्षण विभागाने परिपत्रके काढून हा उपक्रम राबविण्यात येणाऱ्या अडचणी दूर केल्या आहेत. सदरचा कार्यक्रम राज्यातील सर्व इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिक व बौद्धिक वाढीकरिता उपयुक्त ठरणार आहे.

**संदर्भ क्र. ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे** मित्र उपक्रमा अंतर्गत ज्या शिक्षकांनी १० दिवसांचा विपश्यना अभ्यासक्रम पूर्ण केलेला नाही त्यांना तीन तासांचे आनापान प्रशिक्षण घेणे संदर्भात निर्देश देण्यात आलेले आहेत. आपल्या स्तरावरून दरमहा केंद्रस्तरीय शिक्षण परिषदांचे आयोजन केले जाते. केंद्रस्तरीय शिक्षण परिषदांमधील विषयाचे प्राधान्यक्रम ठरवून मित्र उपक्रमाचे नियोजन करण्यात यावे.

**सोबत :** शासन परिपत्रक .

Digitally signed by
Hemant Sharachchandra Vasekar
Date: 29-05-2026 18:34:14

(डॉ. हेमंत वसेकर भा.प्र.से.)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग ,महाराष्ट्र राज्य , मुंबई.
२. मा. आयुक्त ( शिक्षण ), शिक्षण आयुक्तालय , महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. मा. प्रकल्प संचालक, म.प्रा .शि.प., मुंबई.

प्रत माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव -

१. आयुक्त म.न.पा. ( सर्व )
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ( सर्व )
३. शिक्षण संचालक (प्राथमिक/ माध्य. व उच्च माध्य./योजना), शिक्षण संचालनालय, पुणे.